# Greenlawns School, Worli

**वार्षिक परीक्षा – ( द्वितीय सत्र २०२५-२६)**

**मराठी**

**इयत्ता:- ९ वी** **पूर्णांक:- ८०**

**दिनांक:- २७ .०२.२०२६** **वेळ –२ तास**

**सूचना :- सगळे प्रश्न अनिवार्य आहेत.**

**शुद्ध भाषा व सुवाच्य लेखन अपेक्षित आहे.**

---

**प्र. १) खालील पैकी एका विषयावर निबंध लिहा :-. (१०)**

**१. मी अनुभवलेला वनमहोत्सव**

**२.आई संपावर गेली तर**

**३. माझा आवडता विषय**

**प्र.२) 'सरगम' संस्था अमरावतीद्वारे आयोजित 'दिवाळी पहाट' या गायनाच्या कार्यक्रमाची घरपोच तिकीटे मागितल्याप्रमाणे न मिळाल्याबाबत व्यवस्थापकाकडे तक्रार पत्र लिहा. (७)**

**प्र. ३) खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**झाडे ही निसर्गाची अमूल्य देणगी आहे. झाडांशिवाय पृथ्वीवर जीवन शक्य नाही. झाडे आपल्याला प्राणवायू देतात आणि कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात.**

**झाडांपासून आपल्याला फळे, फुले, लाकूड, औषधे आणि सावली मिळते. पक्ष्यांचे निवासस्थानही झाडांवर असते. झाडांमुळे पाऊस पडण्यास मदत होते आणि जमिनीची धूप थांबते.**

**आजच्या आधुनिक युगात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होत आहे. त्यामुळे प्रदूषण वाढत आहे आणि हवामान बदलत आहे. ही खूप चिंतेची बाब आहे.**

**आपण प्रत्येकाने दरवर्षी किमान एक तरी झाड लावले पाहिजे आणि त्याची काळजी घेतली पाहिजे. "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश आपण आचरणात आणला पाहिजे. झाडे वाचवणे म्हणजे आपले भविष्य वाचवणे होय.**

**प्रश्न:**

**१) झाडे पृथ्वीवरील जीवनासाठी का महत्त्वाची आहेत? (२)**

**२) झाडांमुळे पर्यावरणाला कोणते दोन फायदे होतात ? (२)**

**३) वृक्षतोडीमुळे कोणते दुष्परिणाम होत आहेत ? (२)**

४) "झाडे लावा, झाडे जगवा" हा संदेश का महत्त्वाचा आहे? (२)

५) वाक्य बनवा:- दरवर्षी , औषध (२)

## व्याकरण - विभाग

प्रश्न ४) अ) समानार्थी शब्द लिहा :- (२)

१. दीर्घ -

i) मोठी ii) मोठि iii) मौठी iv) मोटि

२. श्रम-

i) सखा ii) भाग्य iii) कष्ट iv) स्वप्न

आ ) विरुद्धार्थी शब्द लिहा :-. (२)

१. सावध

i) बेसवाध ii) बेसकाद iii) बेसवध iv) बेसावध

२. पूर्वचा

i) पश्चिकेचा ii) पश्चिमेचा iii) पाश्चिमेचा iv) पाचिमेचा

इ) लिंग ओळखा :- (२)

१. गोष्ट

i) नपुसकलिंग ii) पुल्लिंग iii) स्त्रीलिंग iv) यांपैकी काही नाही

२. ध्वज

i) नपुसकलिंग ii) पुल्लिंग iii) स्त्रीलिंग iv) यांपैकी काही नाही

ई ) वचन बदला :-. (२)

१. टोळी-

i) टोळे ii) टोळ्या iii) टोळी iv) टोळा

२. संग्रहालय-

i) संग्रहालयी ii) सांग्रहालयी iii) संग्रहालये iv) संग्रहालयो

उ) खालील दिलेल्या वाक्यांचा प्रकार ओळखा. :- (३)

i ) "चला अभ्यासाला बसा."

ii) भाऊ काका फार श्रीमंत आहेत.

iii) आपला खरा हितचिंतक कोण आहे ?

ऊ) खालील वाक्यांत अविकारी शब्द शोधून प्रकार लिहा.. (२)

i ) ईश्वर सर्वत्र आहे

ii) शाळेपर्यंत रस्ता आहे.

## साहित्य – विभाग ( अंक – ४० )

प्र. ५ ) अ) खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :- (९)

१) "काझीरंगा ही कर्दमभूमी आहे ! " हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

२) सर हंफ्रे डेव्ही यांनी तयार केलेल्या दिव्याच्या मर्यादा लिहा.

३) आव्हान स्वीकारणे हे तर महान व धाडसी व्यक्तींचे लक्षणच असते, या विधानावर तुमचे मत व्यक्त करा.

आ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :- (५)

१)चोरी झाल्यावर नानांनी तिजोरीला काय लावले?

२) एडिसनने कोणते आव्हान स्वीकारले होते?

३) कोणत्या खंडांत बांबूच्या असंख्य जातींची लागवड केली जाते?

४) बंडूनानांचा पेट्यांतील माल कोणी लंपास केला ?

५) काझीरंगा या अभयारण्यचा विस्तार लिहा.

इ) खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा :- (४)

१) जंगलात फिरण्यासाठी मला एक हत्तीण मिळाली होती. तिचे नाव ----------- असे होते

२) हात कंकणाला ----------- कशाला ?

३) अशा त्याच्या प्रयोगच्या ----------- वह्यांची चाळीस हजार पाने भरून गेली.

४) घराभोवतीचा ------------- झगमगाट पाहायला सारे गावच्या गाव लोटले.

ई) एका शब्दात उत्तरे लिहा :- (४)

१) दिव्यामध्ये फिलमेंटसाठी कोणत्या धातूचा प्रयोग यशस्वी झाला?

२) एडिसनने कुठे प्रचंड मोठा, मांडव उभारला?

३) आसामचे वैशिष्ट्य दाखवणारा प्राणी-

४) एडिसनच्या अंगी असणाऱ्या कोणत्या गुणामुळे त्याला यश मिळाले,असें तो म्हणतो -

उ) शब्दार्थ लिहा :- (३)

१. थट्टा -

२. प्रचंडकाय -

३. निरभ्र -

## <u>कविता – विभाग</u>

प्र. ६) अ) खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा:-

१. आपल्या देशात शांती निर्माण व्हावी यासाठी पुन्हा एकदा काय व्हावे असे तुम्हांस वाटते ते स्वतःच्या शब्दांत लिहा. (३)

२. 'पुन्हा एकदा' या कवितेतून मिळणारा संदेश लिहा (३)

३. व्यायामामुळे शरीरातील रक्तव्यवस्था कशी होते? (१)

४. पुन्हा एकदा पिंगा घालीत कोण यावे ? (१)

आ) पुढील कवितेच्या ओळींचे भावार्थ लिहा :- (२)

व्यायाने वाढे प्रतिकार शक्ति I स्वावलंबनाची प्रवृति I
व्यायाम अंगी वाढे स्फूर्ति ! कार्य करण्याची I

इ)शब्दार्थ लिहा :-. (५)

१. जडत्व - २. आरोग्य - ३. चाहूल - ४. रक्त - ५. भारले जाणे -

-----------×समाप्त ×-------------